# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

पत्र पेटीक्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org;roaurangabad.dte@gmail.com;


तात्काळ

जा.क्र. विकाऔ/माहिती तंत्रज्ञान/२०१४/६३२४

दिनाक - / २ /२०१४ 24 SEP 2014

प्रति,

प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद
शासकीय औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद
शासकीय तंत्रनिकेतन औरंगाबाद, बीड,हिंगोली,अंबड,
जालना,नांदेड, उस्मानाबाद, जिंतूर,
शासकीय नि.म.तं. लातूर, पु.ला.शा.तं.लातूर

विषय — एम.आय.एस. प्रणाली मध्ये बांधकामाबद्दलची माहिती भरणेबाबत...

संदर्भ - मा. संचालक तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र

१. क्रमांक ११/तंशिसं/ MIS/२०१४-१५/९१२, दिनांक १७/०९/२०१४

२. क्रमांक ११/तंशिसं/ MIS/२०१४-१५/९३१, दिनांक २३/०९/२०१४

तंत्रशिक्षण संचालनालयाने विकसित केलेल्या एम.आय.एस. प्रणाली मधील कन्स्ट्रक्शन मोडयुल मध्ये संस्थेच्या बांधकामाविषयक माहिती तसेच प्रणालीमधील उर्वरित मॉडयुलमध्ये संपुर्ण व अचुक माहिती भरणेबाबत यापुर्वि कळविले आहे.

तथापि, ब-याच संस्थांनी अद्याप सदरची माहिती भरली नसल्याचे संचालनालयाने उपरोक्त पत्राद्वारे कळविले आहे. तसेच याबाबत मा. प्रधान सचिवांकडे याबाबत प्रझेंटेशन करावयाचे असल्याचेही कळविले आहे.

या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, संस्थेची संपुर्ण माहिती एम.आय.एस. प्रणाली मध्ये तातडीने अद्ययावत करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय औरंगाबाद.

तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.
E-mail : desk11@dte.org.in Internet :http/www.dte.org.In

क्रमांक :- ११/तंशिस/MIS/२०१४-१५/ ८३७.
दिनांक : २३/९/२०१४

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/
अमरावती/नागपूर.

**विषयः- एमआयएस प्रणालीमध्ये माहिती भरण्याबाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने असे निदर्शनास आले आहे की, या संचालनालयामार्फत संस्थापित केलेल्या ऑनलाईन एमआयएस प्रणालीमध्ये बऱ्याचशा संस्थांनी अद्याप पूर्णतः माहिती भरलेली नाही. त्यामुळे संचालनालय स्तरावर एकत्रित स्वरुपात सांख्यिकी माहिती उपलब्ध होत नाही. परिणामी वरीष्ठ कार्यालयास माहिती सादर करताना कालापव्यय होतो.

सदर प्रकरणी तात्काळ कार्यवाही करून संपूर्ण प्रणाली अद्यावत माहितीसह सुसज्य करण्याचे मा.प्रधान सचिवांनी निर्देश दिले आहेत.

यास्तव सर्व विभागीय सहसंचालकांनी व्यक्तीशः आपल्या अधिनस्त सर्व शासकीय संस्थांच्या प्राचार्यांशी संपर्क साधून सदर एमआयएस प्रणालीमध्ये माहिती संकलित करण्याच्या सूचना द्याव्यात आणि याबाबत केलेल्या कार्यवाहीचा आढावा घ्यावा.

यासंदर्भात दि.८/१०/२०१४ रोजी मा.प्रधान सचिवांना या प्रणालीचे त्यातील माहितीसह सादरीकरण करावयाचे आहे. सदर सादरीकरण विभागनिहाय करावयाचे असून संबंधित विभागाच्या सहसंचालकांना व्यक्तीशः सादरीकरण करावे लागेल याची नोंद घ्यावी.

(डॉ.सुभाष महाजन)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई

**तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.
E-mail : desk11@dte.org.in Internet :http/www.dte.org.in

क्रमांक :- ११/तंशिस/MIS/२०१४-१५/०७२
दिनांक : ९/०९/०९/२०१४

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद/
नाशिक/अमरावती.

**विषयः- एमआयएस प्रणाली मधील डाटाबाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने असे निदर्शनास आले आहे की, या संचालनालयासाठी विकसित केलेल्या एमआयएस प्रणाली मधील कन्स्ट्रक्शन संबंधी मॉडयूलमध्ये बऱ्याचशा संस्थांनी माहिती पूर्णतः भरली नसल्याने, संस्थांमधील बांधकामाबाबत ऑनलाईन माहिती उपलब्ध होत नाही. परिणामी वरीष्ठ कार्यालयास माहिती सादर करताना अडचणी येतात. वरीलप्रमाणे माहिती भरण्याच्या सूचना यापूर्वीच या कार्यालयाने दिलेल्या आहेत. मात्र नाशिक विभागातील काही संस्थां व्यतिरीक्त इतर विभागांतील संस्थांची माहिती अद्याप अपूर्ण आहे. या माहितीचे मा.प्रधान सचिवांना थेट ऑनलाईन सादरीकरण दि.३० सप्टेंबर २०१४ रोजी करावयाचे असल्याने, आपण व्यक्तीशः लक्ष घालून सर्व संस्थांना याबाबत तातडीने कार्यावाहीच्या सूचना द्याव्यात. तसेच सर्व संस्थांनी या संदर्भात एका जबाबदार अधिकाऱ्याची नेमणूक करून त्याबाबत या कार्यालयास कळवावे अशा देखील सूचना द्याव्यात.

(डॉ.सुभाष महाजन)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई